अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# समाजाला सामर्थ्यविचार देणारे रामदास स्वामी

बहुत जनासी चालवी।नाना मंडळे हालवी।
ऐसी हे समर्थ पदवी।विवेके होते।
जितके काही उत्तम गुण।ते समर्थाचे लक्षण।
अवगुण ते करंट लक्षण।सहजचि झाले।

ज्यांना समर्थ या बिरुदावलीने अवघा भारत ओळखतो त्या समर्थ रामदास स्वामींचा आज समाधी दिवस. चारशे वर्षांपूर्वी समाजातल्या दुबळेपणाचे निरीक्षण केल्यानंतर आपला समाज विचाराने आणि कृतीने समर्थ व्हावा यासाठी त्यांनी जी खडतर तपश्चर्या केली. त्यामुळेच आज भारतीय संस्कृती आणि तिचा अध्यात्मविचार आत्मविश्वासाने उभा राहू शकला. वर उल्लेख केलेल्या दासबोधातल्या श्लोकामध्ये समाजातल्या प्रत्येकाला आत्मविश्वासाने जागा करणारा विविध संस्थांच्या माध्यमातून लोकांना कार्यप्रवण करणारा जो कोणी असतो त्याला समर्थ ही पदवी शोभून दिसते आणि ती सहजासहजी प्राप्त होत नाही. किंबहुना हा सगळा व्यवहार करताना तितक्याच धाडसाचा, त्यागाचा, समर्पणाचा विचार आवश्यक असतो. रामदास स्वामिंनी तो विवेक विचार आपल्यामध्ये बाणवला होता. गावोगाव प्रवास करून समाजातला भक्तिविचार त्यांनी जागवला होता. अनेक संस्थांना त्यांनी कार्यरत केले होते आणि म्हणून त्यांना समर्थ ही पदवीसुध्दा सार्थ ठरत होती. याच श्लोकात त्यांनी म्हटले आहे की, जितके काही उत्तम गुण असतात ते सामर्थ्यासाठी अत्यंत आवश्यक असतात. अवगुणांचा भडिमार हे समाजातल्या करंटेपणाचे लक्षण असते आणि ते सहजपणे येते. त्यासाठी फार कष्ट घ्यावे लागत नाहीत. समर्थ रामदास स्वामींचा सामर्थ्यविचार हा व्यक्ती आणि समाजामधला आत्माराम जागा करणारा होता. हा आत्माराम म्हणजेच स्वत:मध्येच सुप्त रूपाने असलेला आत्मविश्वास त्यांना जागा करायचा होता. सामर्थ्य म्हणजे काय तर व्यक्ती असेल तर ती शारीरिकदृष्ट्या सक्षम, मानसिकदृष्ट्या खंबीर आणि बौध्दिकदृष्ट्या तत्पर असेल तर ती समर्थ समजली जाते. अशा व्यक्तीचा समूह म्हणजेच तसा समाज हादेखील सामर्थ्यवान म्हणून ओळखला जाऊ शकतो. रामदास स्वामींच्या काळामध्ये सगळा समाज परकीय आक्रमणांनी गांजला होता आत्म विस्मृत समाजातले चैतन्य त्यांना जागृत करायचे होते ते करण्यासाठी तितक्याच मुलभूत आणि भक्कम नियोजनाची गरज होती. केवळ 'दासबोध' लिहिला प्रपंच करावा नेटका असे उपदेशामृत पाजले म्हणजे आपले काम झाले असे न करता त्यांनी त्याची एक स्वतंत्र अशी कार्यपध्दती निर्माण केली. कोणताही नवा विचार समाजाला जेव्हा द्यायचा असतो तेव्हा त्या विचारामागे तशाच कृतीचे पाठबळ आवश्यक असते. समर्थांनी विचारांबरोबर कृतीचेही सामर्थ्य समाजाला दिले आणि म्हणून आजदेखील त्यांचा हा सामर्थ्यविचार प्रासंगिक ठरतो.

### प्रपंच आणि परमार्थाचा बोध

त्यांच्या सामर्थ्य विचाराचे महत्त्व छत्रपती शिवाजी महाराजांनी जाणले. आणि म्हणूनच रामदास स्वामिंनी महाराजांमधील विचार आणि कृतीचे सामर्थ्य ओळखून 'जाणता राजा' अशी पदवी बहाल केली. म्हणूनच तर त्यांनी शिवरायांचे 'कैसे चालणे शिवरायांचे कैसे बोलणे' अशा अगदी बारीक निरीक्षणामधून महाराजांमधला समर्थपणाच सांगितला होता. रामदासस्वामी छत्रपती शिवाजी महाराजांपेक्षा बावीस वर्षांनी मोठे होते. प्रामुख्याने परकीय आक्रमणांनी ग्रासलेल्या या समाजात संजीवनी निर्माण करायची असेल तर तिच्यामध्ये सांस्कृतिक अस्मिता जागी करावी लागेल आणि यासाठी समर्थांनी चार सूत्रे मांडलेली दिसतात. सर्वप्रथम त्यांनी व्यक्तीला महत्त्व दिले. व्यक्तीमध्ये भक्तीचे रसायन निर्माण केले. भक्तीच्या माध्यमातून त्याच्यामध्ये शक्तीची जाणीव त्यांनी निर्माण केली. त्याला प्रत्यक्ष कृतीची जोड दिली आणि अशा व्यक्ती, भक्ती, कृती या तीन गोष्टींमधून त्याच्यामध्ये असलेल्या शक्ती किंवा सामर्थ्याचे प्रत्यंतर त्यांनी आणून दिले. स्वत:ची ओळख विसरलेल्या प्रापंचिक माणसाला त्यांनी अशी काही विचारमौक्तिके दिली की, त्याचा व्यक्तीच्या मनावर परिणाम होऊ लागला. स्वार्थामध्ये अडकलेल्यांना समाजासाठी समर्थ करण्याचे फार मोठे कार्य त्यांना करायचे होते. म्हणून त्यांनी दासबोधामध्ये अतिशय स्पष्ट शब्दांत सांगितले की,

प्रपंच अथवा परमार्थ जाणता तोचि समर्थ।
नेणता जाणिजे वेर्थ।नि: कारण।

ज्यांनी प्रपंच आणि परमार्थ नीट जाणला त्याला त्यांनी समर्थ ठरवलेच याशिवाय त्यांनी एक महत्त्वाचे हितगूजही सांगून टाकले.

रात्रंदिवस पहावा अर्थ। अर्थ पाहेल तो समर्थ।
परलोकीचा निजस्वार्थ। तेथेचि घडे।

म्हणजे खऱ्या स्वार्थाची ओळखच त्यांनी समाजाला करून दिली. ज्यामधून व्यक्तीला आपले जीवन सत्कारणी लागल्याचा अनुभव येईल आणि अशा प्रकारची कामे जर आपल्या हातून घडली तरच तो खरा स्वार्थ असतो, असा एक अलौकिक विचार त्यांनी मांडला.

### स्वत:च्या शोधाची किमया

चारशे वर्षांपूर्वीच्या अतिशय कठीण काळामध्ये समाजाला काही सांगणे आणि त्याच्याकडून काही करवून घेणे ही काही साधी सोपी गोष्ट नव्हती. आजच्या माणसाला जर हे सांगितले तर त्यांच्या या श्लोकाचा तो वेगळाच अर्थ काढेल आणि समर्थांनी अर्थ म्हणजे पैशाचाच विचार मांडून समर्थ व्हायला सांगितले. असे आजचा माणूस आपल्या अकलेचे तारेही तोडायला कमी करणार नाही. परंतु अशा पैशाच्याच चिंतनात आयुष्य घालवणाऱ्यांना जागे करण्याचे कामही समर्थांनी केले आहे. म्हणून त्यांनी असे आवाहन अगदी स्वत:ला उच्चशिक्षित म्हणवणाऱ्यांनाही केले आहे.

सकळ केलियाचे फळ।शाश्वत ओळखावे निश्चळ।
आपण कोण हा केवळ।शोध घ्यावा।

आयुष्यामध्ये जे काही आपण करतो त्याचे नेमके फळ काय हे निश्चितपणे ओळखता आले पाहिजे आणि त्यातूनच आपणही नेमके कोण आहोत याचा शोध घेता आला पाहिजे. समर्थांनी सांगितलेला हा स्वत:चा शोध म्हणजेच त्याच्यातील दडलेल्या सामर्थ्याचा मोठा बोध होता. भक्तिमार्गाने ईश्वराच्या आणि सद्विचारांच्या सान्निध्यात हा आत्मसाक्षात्कार घडू शकतो. ही किमया समर्थांनी करून दाखवली. त्यांनी ठिकठिकाणी स्थापन केलेले मठ किंवा समाजातल्या बलसंवर्धनासाठी स्थापन केलेली मारुतीची मंदिरे ही जीवनाचा अर्थ सांगणारी व्यक्ती आणि समाजाला समर्थ बनवणारी होती. ज्याची आजही गरज आहे.